२०१८-२०१९

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग



## १८ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २०१८ - ३१ मार्च २०१९

# महाराष्ट्र राज्य
# मानवी हक्क आयोग

## १८ वा वार्षिक अहवाल
## १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९

वाय ४६१-१

## वार्षिक अहवाल – वर्ष २०१८-१९

उपोद्‌घात

**"जेव्हा एखाद्या व्यक्तीचे हक्क धोक्यात येतात तेव्हा प्रत्येक व्यक्तीचे हक्क कमी होतात"**

**– जॉन एफ. केनेडी**

दिनांक १ एप्रिल २०१८ ते दिनांक ३१ मार्च २०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करताना आयोगाला आनंद होत आहे.

मानवी हक्क म्हणजे सर्व मानवांचे अनन्य संक्राम्य असलेले मूलभूत हक्क. मानवी हक्क हे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्‌गम, लिंग, जात, जमात इत्यादींच्या पलीकडे सार्वत्रिक अशा स्वरूपाचे आहेत. राष्ट्रसंघाच्या (यूनो) परिषदांनुसार व संकेतांनुसार व मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये भर दिल्यानुसार कोणत्याही देशामध्ये कोणतीही राजकीय, आर्थिक किंवा सांस्कृतिक पद्धती अंमलात असली तरीही सर्व मानवी हक्कांचे संरक्षण करणे त्यांना व त्यांना प्रोत्साहन देणे हे त्या-त्या राज्याचे कर्तव्य आहे. त्यानुसार भारतामध्ये मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ अस्तित्वात आला.

या अधिनियमाचे उद्दिष्ट सीमित असले, म्हणजेच मानवी हक्क आयोग हा केवळ सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचीच चौकशी करू शकतो आणि केवळ शिफारस करणारे आदेशच जारी करू शकतो तरीही महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने त्यांचे मर्यादित अधिकार व मर्यादित अधिकार क्षेत्र यामध्येही आयोगाला प्राप्त झालेल्या मानवी हक्क अधिकारांच्या उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करणे व स्वतःहून पुढाकार घेऊन चौकशी करणे याद्वारे सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्काच्या उल्लंघनामध्ये लक्ष घातले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये जागरुकता आणण्यासाठी महाराष्ट्र राज्याने केलेल्या प्रयत्नांचे फळ म्हणून मोठ्या संख्येने तक्रारी प्राप्त झाल्या व त्यांची चौकशी करण्यात आली. आयोगाला मिळणारे अनुदान व पायाभूत सुविधा मर्यादित असल्या, तरीही आयोग मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबतची गाऱ्हाणी व तक्रारी याकडे लक्ष देत आहे. महाराष्ट्र राज्यात मानवी हक्कांच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे व सर्व समाजाच्या कल्याणासाठी मानवी हक्कांच्या संरक्षणाचे संवर्धन करणाऱ्या संस्कृतीला प्रोत्साहन देणे यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग प्रयत्न करीत आहे. या अहवालामध्ये आयोगाच्या या प्रयत्नांचे प्रतिबिंब दिसते.

M.A.Sayeed

(एम.ए.सईद)
प्रभारी अध्यक्ष / सदस्य.

(तुकाराम मुंढे)
सचिव.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | उपोद्घात | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | परिचय | १ ते ४ |
| २. | आयोगाने हाताळलेल्या तक्रारी | ५ ते ७ |
| ३. | मा. अध्यक्ष व सदस्य यांच्या भेटी | ८ |
| ४. | स्त्रोत | ९ |
| ५. | उदाहरणादाखल खटले | १० ते १९ |
| ६. | आयोगाने केलेल्या शिफारशींची शासनाने केलेली पूर्तता आणि अव्हेर | २० ते २१ |

## विभाग १ – परिचय

मानवी हक्क म्हणजे मानवी वर्तणूकीच्या दर्जाची विवरण करणारी काही नैतीक तत्त्वे किंवा रिवाज होय. सदर मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये नियमितपणे संरक्षण होते. सर्वसाधारणपणे जे मानवी हक्क म्हणजे असे मूलभूत हक्क की जे मानवाला तो केवळ मानव आहे म्हणून त्याच्या जन्मापासून प्राप्त असलेले असे स्वाभाविक हक्क की जे अनन्य संक्राम्य आहेत व जे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्‌गम, लिंग, जात, जमात किंवा अन्य स्थिती यांच्या पलीकडे आहेत. ते हक्क सर्वत्र लागू पडतात व सार्वत्रिक आहेत आणि प्रत्येक व्यक्तीला सारखेच आहेत या अर्थाने ते हक्क समतावादी आहेत. त्यांच्यासाठी समरसतेची आवश्यकता असते. तसेच कायद्याच्या नियमांची आवश्यकता असते व त्याद्वारे एखाद्या व्यक्तीने अन्य व्यक्तींच्या मानवी हक्कांचा सन्मान करावा असे त्या व्यक्तीवर बंधन येते.

मानवी इतिहासामध्ये हक्क व स्वातंत्र्याच्या कल्पना कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपामध्ये अस्तित्वात असल्या तरीही मानवी हक्कांच्या पूर्वीच्या कल्पना या मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पनांशी फारशा जुळत नव्हत्या. मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पना यांचा उगम आपल्याला युरोपमधील पुनरुज्जीवन व प्रोटेस्टंटांच्या सुधारणा यातून शोधता येईल. तसेच मध्य युगामध्ये प्रभवाशाली असलेल्या सरंजामशाही पद्धती व धार्मिक रुढीप्रियता यांचा अस्त होणे यातूनही मानवी हक्कांच्या आधुनिक कल्पनांचा उगम शोधता येईल.

रेडक्रॉसच्या आंतरराष्ट्रीय समितीचे संस्थापक श्री. हेन्री डुआंट यांच्या प्रयत्नांमुळे १८६४ व १९४९ यांच्यामध्ये जिनेव्हा संकेत अस्तित्वात आले. हे संकेत सशस्त्र संघर्षामध्ये गुंतलेल्या व्यक्तींच्या मानवी हक्कांचे संरक्षण करतात व ते १८९९ व १९०७ च्या हेग संकेतावर आधारित आहेत. धर्मनिरपेक्ष आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उपजत स्वरूपामध्ये युद्ध व युद्ध विषयक गुन्हे याबाबतच्या कायद्यांना औपचारिक स्वरूप देण्याचा हा आंतरराष्ट्रीय समाजाचा पहिला प्रयत्न होता. दुसऱ्या महायुद्धामुळे या संकेतामध्ये सुधारणा झाली व ते संकेत आंतरराष्ट्रीय समाजाने १९४९ मध्ये पुन्हा स्वीकारले.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या विश्वामध्ये मानवी हक्कांचे सामाजिक व कायदेशीर पद्धतीने संरक्षण होणे हे मूलभूत स्वातंत्र्य असावे याची काळजी वाढू लागली. संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना व संयुक्त राष्टसंघाच्या सनदीच्या तरतुदी या मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा व पद्धतीसाठी एक सर्वसमावेशक व्यवस्थेचा / यंत्रणेचा पाया ठरला.

मानवी हक्क सार्वत्रिक असणे, ते हक्क सर्व जगभरात समान असणे हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायद्यांचा पायाभूत मानक ठरला. १९४८ साली मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये या तत्त्वांवर पहिल्यांदा भर देण्यात आला व अनेक आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संमेलने, ठराव व घोषणांमध्ये या तत्त्वांचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. उदाहरणार्थ १९४३ च्या व्हिएन्ना आंतरराष्ट्रीय संमेलनामध्ये असे नोंदले गेले की देशांची राजकीय, आर्थिक व सांस्कृतीक प्रणाली किंवा यंत्रणा कोणतीही असली तरी सर्व मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याला प्रोत्साहन देणे व त्यांचे संरक्षण करणे हे देशांचे कर्तव्य आहे.

मानवी हक्कांबाबतची सार्वत्रिक घोषणा यांच्या कलम १ मध्ये असे म्हंटले आहे "सर्व मानव स्वतंत्ररीत्या जन्माला आले आहेत व ते सन्मान/प्रतिष्ठा व हक्क याबाबत समान आहेत. त्यांना समजूतदारपणा व सदसदविवेकबुद्धी लाभली आहे व त्यांनी बंधुत्वाच्या भावनेने एकमेकांबरोबर वागावे." भारताच्या घटनेमध्ये सुद्धा मानवी हक्कांच्या सर्व सार्वत्रिक घोषेणेचा मूलभूत हक्क म्हणून समावेश केला आहे. भारताच्या संसदेने १९४३ मध्ये **मानवी हक्क संरक्षण अधिनियम,** १९९३ पारित केला. हा अधिनियम मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध सुरक्षितता प्रदान करतो. या अधिनियमामध्ये राष्ट्रीय मानव हक्क आयोग व राज्य मानव हक्क आयोगाची स्थापना करण्याचा तसेच जिल्हा स्तरावर मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे. आंतरराष्ट्रीय संकेत व मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ यांच्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापन दिनांक ६ मार्च, २००१ रोजी झाली.

### <u>आयोगाची रचना</u>

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही वैधानिक संस्था आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे –

- जी व्यक्ती एखाद्या उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश होती अशी व्यक्ती आयोगाची अध्यक्ष असेल.
- अशी व्यक्ती की जी उच्च न्यायालयाची न्यायाधीश होती किंवा आहे किंवा राज्यातील जिल्हा न्यायालयामध्ये न्यायाधीश होती किंवा आहे आणि त्या व्यक्तीला जिल्हा न्यायाधीश म्हणून किमान सात वर्षे अनुभव आहे, अशी व्यक्ती आयोगाची सदस्य असेल.
- अशा व्यक्तीला आयोगाचा सदस्य नेमला जाईल की ज्या व्यक्तीला मानवी हक्कासंबंधित बाबींच्या संबंधित अनुभव असेल किंवा मानवी हक्कासंबंधित बाबींचे ज्ञान असेल.

**<u>आयोगाचे कार्य</u>**

शासकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मानवी हक्कांचा भंग होत आहे का यावर लक्ष ठेवणे व त्याबाबत चौकशी करणे हे मानवी हक्क आयोगाचे मुख्य कार्य आहे.

अधिनियमाच्या कलम १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खाली नमूद केलेली सर्व कार्य आयोग करते.

(अ) पीडीताने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणीही सादर केलेल्या तक्रारीवरुन आयोग स्वतःहून किंवा न्यायालयाच्या आदेशावरुन आयोग खालील बाबतीत कृती करू शकतो;

- मानवी हक्कांचे उल्लंघन किंवा असे उल्लंघन होण्यासाठी प्रोत्साहन दिले गेले आहे;
- मानवी हक्कांचे असे उल्लंघन होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात हलगर्जीपणा होणे;

(ब) मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे / झाले आहे असे आरोप असलेल्या न्यायालयासमोर असलेल्या कोणत्याही खटल्यामध्ये न्यायालयाच्या अनुमतीने मध्यस्थी करणे;

(क) त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यामध्ये काहीही तरतूद असली तरीही राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही संस्थेला, तुरुंगाला भेट देणे की जेथे माणसांना उपचारासाठी, सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी स्थानबद्ध केले आहे. सदर स्थानांमध्ये असलेल्या व्यक्तींसाठीच्या राहण्याच्या परिस्थितीचा अभ्यास करणे व त्याबाबत शिफारसी करणे यासाठी या भेटी दिल्या जातील;

(ड) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी घटनेमध्ये किंवा अन्य कोणत्याही कायद्यामध्ये कोणते सुरक्षा उपाय योजले आहेत याचा आढावा घेणे व त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाययोजना सुचवणे;

(इ) मानवी हक्कांचा उपभोग घेण्यात अडथळे आणणाऱ्या कोणत्याही घटकांचा, की ज्यात दहशतवादाचा समावेश आहे, आढावा घेणे व त्यावर उपाययोजना सुचवणे;

(फ) मानवी हक्कांबाबत करार व अन्य आंतरराष्ट्रीय कागदपत्रे, उपाययोजना यांचा अभ्यास करणे व त्यांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी शिफारसी करणे;

(ग) "मानवी हक्क" या क्षेत्रामध्ये संशोधन करणे व अशा संशोधनाला प्रोत्साहन देणे;

(ह) समाजाच्या अनेक स्तरांमध्ये मानवी हक्क साक्षरतेचा प्रसार करणे व अशा हक्कांच्या रक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुरक्षा उपायांची विविध माध्यमांकडून प्रसिद्धी, संमेलने व अन्य साधनांमधून करणे;

(आय) "मानवी हक्क" या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटनांच्या व अन्य संघटनांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे;

(ज) मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारी अन्य कोणतीही कार्ये.

**<u>आयोगाकडे तक्रार करतानाची कार्यपद्धती किंवा आयोग स्वतःहून कृती करील तेव्हाची कार्यपद्धती</u>**

१. मानवी हक्कांचा भंग झाल्याची तक्रारी पीडीत व्यक्ती किंवा त्या व्यक्तीतर्फे अन्य व्यक्ती तक्रार दाखल करू शकेल. सदर तक्रार मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत करता येईल. सदर तक्रार ऑनलाईन किंवा टपालाने सादर करता येईल.

२. तक्रार करताना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही, कोणतेही कोर्ट फी तिकीट लावावे लागणार नाही. वकील नेमण्याची गरज नाही.

३. कोणत्याही शासकिय सेवकांविरुद्ध तक्रार करायची असेल तर ती आयोगाच्या अध्यक्षांना उद्देशून करायची असते व त्यामध्ये खालील तपशील असणे आवश्यक आहे.

- तक्रारदाराचे पूर्ण नाव
- तक्रारदाराचा पूर्ण टपालाचा पत्ता
- टेलिफोन क्रमांक / ई-मेल क्रमांक

- घटनेची तारीख व स्थळ.
- घटना केव्हा घडली ती वेळ.
- मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या घटनांचा तपशील स्पष्ट करा.
- कोणत्या शासकीय सेवकाविरुद्ध / शासकीय विभागाविरुद्ध / शासकीय संस्थेविरुद्ध / शासकीय प्राधिकरणाविरुद्ध तक्रार केली जात आहे?
- सदर बाब कोणत्याही न्यायालयात, राष्ट्रीय मानव हक्क आयोगात, न्यायासनात किंवा अन्य वैधानिक मंचाकडे प्रलंबित आहे काय?
- ज्या अनुतोषाची मागणी केली आहे तो अनुतोष

## आयोगाकडे येण्याचे फायदे


| | | |
|---|---|---|
| संस्थात्मक स्वायत्तता व स्वातंत्र्य | सोपी उपलब्धता | कोणतेही शुल्क आकारले जात नाही |
| कमी किचकट कार्यपद्धती | त्वरित न्याय | कोणत्याही व्यावसायिक वकिलाच्या सहाय्याची आवश्यकता नाही |

## भाग २ – विभाग आयोगाने हाताळलेल्या तक्रारी


दि.१ जानेवारी, २०१८ ते दि.३१ डिसेंबर, २०१८ या काळामध्ये आयोगाला एकूण ६,७७० तक्रारी प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या तक्रारींपैकी खूप तक्रारी आयोगाने विचारात घेतल्या नाहीत. कारण त्या महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (कार्यपद्धती) नियमन, २०११ नियमन क्रमांक १२ नुसार एक तर टिकण्यासारख्या नव्हत्या किंवा आयोगाच्या कक्षेबाहेर होत्या. यातून आयोगाचे अधिकार व कार्य याबाबत पुरेशा जागरुकतेचा अभाव दिसून येतो. आयोगाचे अधिकार व कार्य याबाबत जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी भाषणांचे आयोजन करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. खालील तक्त्यामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी व निकालात काढलेल्या तक्रारी यांचा तपशील दिला आहे.

**दि.१ जानेवारी, २०१८ ते दि.३१ डिसेंबर, २०१८ या काळातील खटल्यांचा सांख्यिकी तक्ता**

| आधी प्रलंबित असलेले खटले / प्रारंभीची शिल्लक | नव्याने प्राप्त झालेल्या तक्रारी | सदर कालखंडातील एकूण तक्रारी | वर्षात एकूण निकालात काढलेल्या तक्रारी | परिहार केलेल्या एकूण बाबी / शिफारसी | सदर काळाच्या शेवटी प्रलंबित खटले |
|---|---|---|---|---|---|
| १५,५५५ | ६,७७० | २२,३२५ | ५,३६८ | ४१ | १६,९५७ |




परिहार केलेल्या एकूण बाबी – ४१




**टीप :** उपरोक्त काळामध्ये खाजगी सल्लागारांनी विकसित केलेल्या यंत्रणांमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे वर्षाच्या काही काळाची माहिती एक्सेल शीटमध्ये ठेवली होती. त्यामुळे २६७४ खटल्यांची उपरोक्तप्रमाणे वर्गवारी उपलब्ध नाही.

**तक्रारींचे स्वरूप**


* शासकीय विभागांमध्ये शेती, वनविभाग, आरोग्य विभाग, आदिवासी विभाग, पर्यावरण विभाग, अन्य विभाग, महसूल विभाग इत्यादींचा समावेश होतो.

* संकीर्णमध्ये शासनाच्या संस्था, बँक, महामंडळे, कौटुंबिक वादविवाद वसूली करणारे एजंट, कर्जे इत्यादींचा समावेश होतो.

एकूण तक्रारी - ६७७०

**जानेवारी, २०१८ ते डिसेंबर, २०१८ या काळातील न्यायालय १, २, ३ मध्ये निकालात निघालेल्या खटल्यांचा तपशील**

| **कालखंड** | **प्राथमिक स्तरावरील खटले (लिमिने)** | **१७(१)(ब)** | **सुनावणीनंतर** | **शिफारसी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी, २०१८ ते डिसेंबर, २०१८ | ३६८३ | ० | १६४४ | ४१ | ५३६८ |



**विभाग ३ – माननीय अध्यक्ष व माननीय सदस्य किंवा अन्वेषण चमू (टीम) यांनी दिलेल्या भेटी**

तुरुंग, पोलीस ठाणे, संमेलने, परिषदा व अन्य महत्वाचे कार्यक्रम येथे आयोगाच्या माननीय सदस्यांनी दि.१ एप्रिल, २०१८ ते दि.३१ मार्च, २०१९ मध्ये दिलेल्या अधिकृत भेटींचा तपशील.

अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) व प्रशिक्षण

संस्थेमार्फत भेट

| अ.क्र. | भेटीच्या तारखा | संस्थेचे नाव | सहभाग घेणारे |
|---|---|---|---|
| १. | २१.०६.२०१८ | आझाद मैदान पोलीस ठाणे | २६ कायद्याचे विद्यार्थी |
| २. | २२.०६.२०१८ | भायखळा तुरुंग | २६ कायद्याचे विद्यार्थी |
| ३. | २५.०६.२०१८ | बालन्याय मंडळ, मुंबई | २६ कायद्याचे विद्यार्थी |

**अंतर्वासीकरण (इंटर्नशिप)**


कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी हिवाळ्यात एक व उन्हाळ्यात एक असे दोन अंतर्वासीकरण (इंटर्नशिप) कार्यक्रम राबवले जातात. हे विद्यार्थी अनेक देशातील विधी महाविद्यालये, विधी विद्यापीठे यातून येतात.

| अ.क्र. | कालावधी | कार्यक्रम | सहभाग घेणाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | ०१.०६.२०१८ ते ३१.०६.२०१८ | उन्हाळ्यामधील अंतर्वासीध करण (इंटर्नशिप) | २६ |

## विभाग ४ – स्त्रोत

### शासनाकडून वित्तीय वर्ष २०१८-१९ साठी प्राप्त झालेला निधी

| | **रुपये हजारात** |
|---|---|
| वेतनासाठी अनुदान | २७,००० |
| वेतनेतर अनुदान | १२,३०० |
| **एकूण** | **३९,३००** |



## विभाग – ५

## उदाहरणात्मक खटले

१. खटला क्रमांक : १३८५/२०१४

तक्रारदाराचे नाव : सोनल आर. चव्हाण

प्रतिवादीचे नाव : पोलीस उपायुक्त, विभाग ४, मुंबई

आदेशाचा दिनांक : १२ जुलै, २०१८

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

श्रीमती सोनल आर. चव्हाण यांनी अशी तक्रार केली की त्यांची मुलगी शेजारच्या घरामधील वाढदिवसाच्या कार्यक्रमामध्ये आगीत भाजली. हे सदर आरोप दखलपात्र गुन्हा आहे हे स्पष्ट असूनही पोलिसांनी कोणतीही कृती केली नाही व प्रथमदर्शनी अहवालसुद्धा घटना घडल्यानंतर दोन महिन्यांनी दाखल केला. थोडक्यात पोलिसांनी दिरंगाई केली.

**आयोगाने केलेली कृती :**

तक्रार वाचल्यानंतर (असे लक्षात आले की) अशा बाबतीत प्राथमिक चौकशी करणे शक्य नसते. संबंधितांना नोटीस पाठवण्यात आली व ते सुनावणीसाठी हजर झाले. सुनावणीनंतर विद्वान पोलीस महासंचालक यांना असा आदेश देण्यात आला की, त्यांनी याबाबतीत सर्व राज्यातील पोलीस यंत्रणेला ताकीद द्यावी व याबाबतीत चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

**आयोगाचा निर्णय :**

सुनावणीनंतर व अभिलेखांवरील कागदपत्रांचे परिशीलन केल्यानंतर आयोगाला असे आढळून आले की पोलीस उपायुक्त, विभाग ४, मुंबई, जे सार्वजनिक सेवक आहेत, त्यांनी तक्रारदार श्रीमती सोनल आर. चव्हाण यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे आयोगाने पुढील शिफारस केली आहे.

तक्रारदाराला रु.२५,००० इतकी नुकसान भरपाई देण्याचे आदेश आयोगाने दिले. सदर रक्कम अतिरिक्त मुख्य सचिव (ए.सी. एस.) गृह विभाग, मंत्रालय यांनी हा आदेश प्राप्त झाल्यावर चार आठवड्यांमध्ये प्रदान करायची आहे.

२. खटला क्रमांक : ३३०१/२०१७
तक्रारदाराचे नाव : दिनेश बी. नानकटे
प्रतिवादीचे नाव : पोलीस महासंचालक (तुरुंग), पुणे
आदेशाचा दिनांक : २६ जून, २०१८
गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदाराने अशी तक्रार केली आहे की, तक्रारदाराला त्वरीत मुक्त करण्याचा आदेश असूनही चूक करणाऱ्या वर्धा जिल्हा तुरुंग अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा, अज्ञान यामुळे व यथातथा वृत्तीने तक्रारदाराला मुक्त करण्याच्या ऐवजी ज्या अन्य व्यक्तीवर खटला चालू असल्याने ती व्यक्ती तुरुंगात आहे अशा अन्य व्यक्तीला म्हणजेच शरद रतन बावणे याला मुक्त केले आणि तक्रारदाराला दि. ८. ६.२०१७ ऐवजी दि.१०.६.२०१७ ला मुक्त केले.

**आयोगाने केलेली कृती :**

तक्रारीचे परिशीलन करून अभिलेखांमधील कागदपत्र लक्षात घेऊन आयोगाने पुढील निर्णय पारित केला.

**आयोगाचा निर्णय :**

सर्व बाबींचा व कागदपत्रांचा विचार करताना आयोगाचा असा विचार आहे की तुरुंगाच्या अधिकाऱ्यांकडून चूक झाली आहे व त्यामुळे आयोग पुढील शिफारसी करीत आहे.

१. तक्रारदाराच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यामुळे त्याची नुकसान भरपाई म्हणून सदर आदेश प्राप्त झाल्यावर ६ आठवड्यात अतिरिक्त प्रधान सचिव, गृहविभाग, मंत्रालय यांनी तक्रारदाराला रु.१.०० लक्ष इतकी रक्कम द्यायची आहे व सदर रक्कम देण्यात कसूर झाली तर ती रक्कम देईपर्यंत त्यावर प्रतिवर्ष १२.०५% या दराने व्याज द्यावे लागेल.

२. तुरुंगाच्या अधिक्षकांना असे परिपत्रक पाठवावे की त्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे विशेषतः जामीन देण्याचे आदेश व त्या अंतर्गत केलेल्या नियमांची योग्य तऱ्हेने अंमलबजावणी करावी.

३. सदर आदेशाचे अनुपालन ६ आठवड्यांच्या आत करावे व अशा अनुपालनाचा अहवाल आयोगाला माहितीसाठी व आवश्यक कृतींसाठी सादर करावा.

| | |
|---|---|
| ३. खटला क्रमांक : | एमएएस/एसएम/५३/२०१७ |
| तक्रारदाराचे नाव : | स्वतः (आयोगाने स्वत.हून केलेली कृती):- बृहन्मुंबई महानगर पालिकेने वरळी विभागातील खराब झालेल्या रस्त्याचा भाग (स्ट्रेच) गुळगुळीत करण्यात (व्यवस्थित करण्यात) कसूर केल्यामुळे ७७ वर्षांच्या वृद्ध व्यक्तीला दुखापत झाली. |
| प्रतिवादीचे नाव : | महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालिका |
| आदेशाचा दिनांक : | २३ एप्रिल, २०१८ |
| गणपूर्ती (कोरम) : | एम.ए.सईद, सदस्य |

**तक्रारीचे स्वरूप :**

टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई या दैनिकातील मंगळवार दि.१० ऑक्टोबर, २०१७ च्या बातमीनुसार दि.९.१०.२०१७ रोजी ७७ वर्षांची एक महिला सकाळी वरळी सी फेस वर फिरत असताना वरळी सी फेसवरील समोरील विहारपथावरील फरसबंदीवरील ठोकळे निसटून वेडेवाकडे झाले होते. त्यामुळे ती महिला अडखळली व पडली, तिला गंभीर जखमा झाल्या.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने या बातमीचा आधार घेऊन स्वतः होऊनच या बाबीची दखल घेऊन बृहन्मुंबई महापालिका आयुक्तांना स्वतः होऊन नोटीस जारी केली. त्यांच्या उत्तराचा व अभिलेखावरील कागदपत्रांचा विचार केला. रस्त्यांची दुर्दशा, ठिकठिकाणचे खड्डे यांची न्यायालयीन दखल घेतली.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व माहिती ध्यानात घेऊन आयोगाला खालील शिफारसी करणे योग्य वाटते.

(अ) वरील विषयांशी संबंधित रिट याचीकेबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे अंमलबजावणी करणे बाबतचे परिपत्रक प्रधान सचिव (नगर विकास), मुंबई यांनी वितरीत करावे आणि आदेश प्राप्त झाल्यावर सहा आठवडयात या बाबतचा अनुपालन अहवाल सादर करावा.

(ब) सदर घटनेमुळे पीडीत झालेल्या व्यक्तीला मुंबई महानगर पालिका आयुक्त यांनी रु.१०,००,००० (रुपये दहा लक्ष) इतकी रक्कम नुकसान भरपाईपोटी हा आदेश प्राप्त झाल्यावर सहा आठवड्यात द्यावेत व ही रक्कम सदर मुदतीमध्ये न दिल्यास ही रक्कम देईपर्यंत त्या रकमेवर १२.५०% दराने व्याज द्यावे असा आदेश दिला जात आहे.

(क) फौजदारी प्रक्रिया नियम (क्रिमीनल प्रोसिजर कोड) च्या कलम १५४ च्या अंतर्गत प्रथम खबरी अहवाल नोंदणे व गुन्ह्याच्या अन्वेषणामध्ये पोलिसांचे कार्य व अधिकार याबाबत सर्वोच्च न्यायालयाने ललिता कुमारी खटल्यामध्ये घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे मुंबई पोलीस आयुक्त यांनी अभिसरीत करावीत असा आदेश त्यांना दिला जात आहे.

(ड) सदर आदेशाचे अनुपालन ६ आठवड्याच्या आत करावे व अनुपालन अहवाल आयोगाला पुढील आवश्यक कारवाईसाठी सादर करावा.

४. खटला क्रमांक : एमएएस/१०९४/२०१३-१४

तक्रारदाराचे नाव : नामदेव टी. उत्ताने

प्रतिवादीचे नाव : पोलीस अधिक्षक वर्धा

आदेशाचा दिनांक : २९ सप्टेंबर, २०१८

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारीमध्ये असे नमूद केले आहे की, तक्रारदाराच्या मुलाचे दिनांक १०.०५.२०१३ रोजी संशयास्पद परिस्थितीमध्ये निधन झाले. अपघाती मृत्यूची नोंद केली गेली. गुन्हा नोंदल्यानंतर सुद्धा गुन्हा अन्वेषण यथातथा वृत्तीने केले, तसेच गुन्ह्याच्या बाबीचे पूर्ण अभिलेख संबंधित पोलीस उपनिरीक्षकाच्या निष्काळजीपणामुळे गहाळ झाले.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने अन्वेषण विभागाला नोटीस जारी केली, उत्तर अभिलेखावर घेतले व सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे ध्यानात घेऊन आयोग पुढील शिफारसी करणे उचित समजतो.

१. वर उल्लेख केल्याप्रमाणे एजन्सीच्या चुकीमुळे व ढिलेपणामुळे तक्रारदाराच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले व त्याची नुकसान भरपाई म्हणून अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तक्रारदार यांना रु.५.०० लक्ष हा आदेश प्राप्त झाल्यापासून ६ आठवड्यात द्यावेत व सदर रक्कम सदर काळात न दिल्यास या आदेशाच्या तारखेपासून ती रक्कम देईपर्यंत १२% दराने व्याज द्यावे.

२. अतिरिक्त मुख्य अधिकारी, गृह मंत्रालय, मुंबई यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवल्यानंतर गुन्ह्यांचे अन्वेषण विशिष्ट वेळेत पूर्ण करणे व गुन्ह्यांबाबतचे अभिलेख योग्य तऱ्हेने सांभाळून ठेवणे याबाबत संचालक अभियोग, महाराष्ट्र राज्य, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव, विधि व न्याय मंत्रालय, मुंबई यांच्या सल्ला मसलतीने सर्वोच्च न्यायालयाने "दिलावर" या मामल्यामध्ये (वर दिलेल्यानुसार परिच्छेद क्र.६ ते ८) निरीक्षण केल्यानुसार मार्गदर्शक तत्त्वे हा आदेश प्राप्त झाल्यावर तीन महिन्याच्या आत जारी करावीत.

५. खटला क्रमांक : एमएएस/५३१/२०१४
तक्रारदाराचे नाव : ट्रीसा लॉरेन्स बार
प्रतिवादीचे नाव : जिल्हाधिकारी, पालघर
पोलीस अधिक्षक, जिल्हा- पालघर
आदेशाचा दिनांक : १५ नोव्हेंबर, २०१८
गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदाराने अशी तक्रार केली आहे की, ती शारिरीकदृष्टीने अपंग आहे व तिचे अन्य व्यक्तीबरोबर मालमत्ता संबंधित वाद आहेत, तिला वेडी ठरवण्यासाठी व तिची मालमत्ता हडप करण्यासाठी पोलिसांनी तिच्याविरुद्ध खोटे खटले दाखल केले.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने संबंधित व्यक्तीला नोटीस जारी केली, त्यानुसार प्रतिवादीने उत्तर सादर केले, सुनावणी पूर्ण झाली.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी ध्यानात घेऊन आयोगाने पुढील शिफारसी केल्या आहेत.

(अ) सर्वोच्च न्यायालयाने डी.के. बसू या खटल्यामध्ये वर परिच्छेद ४ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील सर्व आयुक्तालय विभागाकडे पाठवून द्यावी की ज्यायोगे कोणत्याही बेकायदेशीर गोष्टी होणार नाहीत व कोणत्याही गोष्टी वगळल्या जाणार नाहीत की ज्यामुळे महाराष्ट्र राज्यातील पोलीस बलाविरुद्ध केवळ दंडात्मक नव्हे तर शिस्तभंगाची कारवाई होणार नाही. तसेच महाराष्ट्रातील सर्व आयुक्तालयांना कार्यपद्धती बाबत जागरुकता, नियम व नियमनबाबत जागरुक करावे व मानसिक आरोग्य अधिनियम या खाली कोणत्याही व्यक्तीला अटक करताना त्यांचे काटेकोर पालन करावे.

(ब) अतिरिक्त मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तक्रारदाराला हा आदेश प्राप्त झाल्यापासून सहा आठवड्यामध्ये रु.२,००,०००/-(रु. दोन लक्ष) इतकी नुकसान भरपाई द्यावी व सदर रक्कम त्यांनी न दिल्यास ती रक्कम देईपर्यंत १२.५०% व्याज द्यावे.

६. खटला क्रमांक : एमएएस/३८०/२०१७

तक्रारदाराचे नाव : अप्पासो ए. माने

प्रतिवादीचे नाव : जे.जे. इस्पितळाचे डीन

पोलीस अधीक्षक, जिल्हा- सांगली

सिव्हील सर्जन सिव्हील हॉस्पिटल, सांगली

जिल्हा शिक्षण अधिकारी, सांगली

आदेशाचा दिनांक : १९ नोव्हेंबर, २०१८

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदाराची अशी तक्रार आहे की, त्याची १३ वर्षांची मुलगी जे.के. माने हायस्कूलमध्ये ७ वी इयत्तेमध्ये शिकते. दि.२२.०९.२०१६ रोजी तिच्या शाळेतील शिक्षक श्री. गायकवाड व राहूल पाटील नावाच्या ८ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. शाळेमध्ये राहूलने तिला आपल्या वासनेचे शिकार होण्यास भाग पाडले. तिला दि.२८.०९.२०१६ रोजी चक्कर आली व ती शाळेतच बेशुद्ध पडली. तिला प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नेण्यात आले व त्यानंतर खाजगी इस्पितळात नेण्यात आले. तिथे तिने डॉक्टर व नर्स यांना आपल्यावर कोसळलेली ही आपत्ती सांगितली. त्यानंतर विटा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली.

**आयोगाने केलेली कृती :**

आयोगाने संबंधितांना नोटीस जारी केली, प्रतिवादींनी उत्तर सादर केले, सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी लक्षात घेऊन आयोग पुढील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) प्रधान सचिव, आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तक्रारदाराला हा आदेश प्राप्त झाल्यानंतर सहा आठवड्याच्या आत रु.१,००,०००/- (रुपये एक लाख) इतकी नुकसान भरपाई द्यावी. सदर रक्कम सदर मुदतीत न दिल्यास ती रक्कम देईपर्यंत १२.५०% व्याज द्यावे.

(ब) अशा तऱ्हेच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय इस्पितळांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना संवेदनशीलतेचे प्रशिक्षण द्यावे व रिक्त जागा त्वरीत भराव्यात. त्यामध्ये सिव्हील हॉस्पिटल तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये स्त्रीरोगामध्ये तज्ञ असलेल्या व्यक्तीची नेमणूक करावी व त्या ठिकाणी आधुनिक वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात. मातृत्वाच्या वाटेवर असणाऱ्या स्त्रियांना मार्गदर्शन करण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागात समुपदेशन करण्यासाठी समुपदेशकांची नेमणूक करण्याची योजना तयार करावी.

(क) अत्यंत वरिष्ठ स्तरावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांपासून अत्यंत खालच्या स्तरावरील वैद्यकीय स्तरावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनी रोग्याला मानवतेने व सन्मानाने वागवावे व आणीबाणीचे प्रसंग सर्वोच्च प्राधान्याने हाताळावेत.

(ड) सदर आदेशांचे अनुपालन सहा आठवड्यात करावे व अनुपालन अहवाल आयोगाला पुढील कारवाईसाठी पाठवावा.

७. खटला क्रमांक : एमएएस/१७८१/२०१६

तक्रारदाराचे नाव : इरफान खान रहमान खान

प्रतिवादीचे नाव : पोलीस अधिक्षक, जिल्हा- जालना

आदेशाचा दिनांक : ११ जानेवारी, २०१९

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

<u>तक्रारीचे स्वरूप</u> :

तक्रारदाराचे असे म्हणणे होते की, दि.२३.०३.२०१६ रोजी होळीच्या दिवशी दोन वेगवेगळ्या समाजाच्या दोन गटांमध्ये तणाव होता. रात्री ८-३० वाजता मशीदीजवळ दोन गटांमध्ये बाचाबाची झाली. पोलिसांना त्यांनी जातीवरुन शिव्या दिल्या व हल्ला केला. गुन्हा नोंदवला गेला. न्याय दंडाधिकाऱ्यांसमोर दाखल केल्यानंतर तक्रादाराने वाईट वागणूक मिळाली, कोठडीत पोलिसांनी छळ केला अशी तक्रार केली. दंडाधिकाऱ्यांनी चौकशी केली व त्यांच्या अहवालाचा विचार केल्यावर प्रधान जिल्हा न्यायाधिशांनी मुख्य न्याय दंडाधिकारी, जालना यांना अहवालाची नोंदणी करून तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले.

<u>आयोगाने केलेली कृती</u> :

आयोगाने संबंधितांना नोटीस पाठवली, त्याला प्रतिवादींनी उत्तर दिले, सुनावणी पूर्ण केली.

<u>आयोगाचा निर्णय</u> :

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी विचारात घेऊन आयोग पुढील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) ज्या पोलीस अधिकाऱ्याने याबाबतीत चूक केली व जो पोलीस अधिकारी तक्रारदार व इतर चौघांवर शारिरीक छळ करण्यासाठी जबाबदार आहे त्याच्यावर कारवाई करण्यासाठी सदर बाबीचे सर्व अभिलेख विशेषतः न्यायालयीन चौकशीचे सर्व अभिलेख विद्वान पोलीस महासंचालक, मुंबई यांच्यासमोर सादर करावेत.

(ब) पोलीस यंत्रणेची कार्य करण्यावरील मार्गदर्शक तत्त्वे ठरवून देणारे सर्वोच्च न्यायालयाचे महत्वाचे खटले (खटल्याची यादी सोबत जोडली आहे) विद्वान पोलीस महासंचालकांनी अभिसरीत करावे.

(क) अतिरिक्त मुख्य सचिव(गृह), मंत्रालय, मुंबई यांनी तक्रारदार यांच्या व अन्य चौघांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याबाबत नुकसान भरपाई म्हणून प्रत्येकी रु.२,००,०००/- हा आदेश प्राप्त झाल्यापासून ६ आठवड्यात द्यावेत. सदर रक्कम त्या काळात ती देईपर्यंत १२% व्याज द्यावे.

(ड) सदर आदेशांचे अनुपालन सहा आठवड्यात करावे व अनुपालन अहवाल आयोगाला पुढील कारवाईसाठी पाठवावा.

८. खटला क्रमांक : एमएएस/१८८९/२०१३-१४
तक्रारदाराचे नाव : अशोक जाधव
प्रतिवादीचे नाव : जिल्हाधिकारी, यवतमाळ
प्रकल्प अधिकारी, जलसिंचन विभाग, यवतमाळ
आदेशाचा दिनांक : ५ फेब्रुवारी, २०१९
गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदाराच्या संत्र्याच्या बागेचे केलेल्या नुकसानीची प्रतिवादी प्राधिकरणाने नुकसान भरपाई देण्यात विलंब केल्यामुळे तक्रारदाराच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले अशी तक्रारदाराची तक्रार आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

संबंधितांना नोटीस पाठवली, त्याला प्रतिवादींनी उत्तर दिले, सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी विचारात घेऊन आयोग पुढील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) तक्रारदाराच्या दाव्यावर त्वरीत लक्ष घालून त्याला त्याच्या संत्र्याच्या बागेच्या नुकसान भरपाईच्या दाव्याची रक्कम योग्य वेळेत न देण्याची चूक करणाऱ्या जलसिंचन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशीची कारवाई करण्याचा विचार विद्वान विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांनी करावा.

(ब) विद्वान विभागीय आयुक्त, महसूल, अमरावती विभाग यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे मार्फतीने संबंधित जलसिंचन विभागाकडून तक्रारदाराच्या दाव्यासंबंधित सर्व अभिलेख मागवून घ्यावा. योग्य आणि उचित चौकशी केल्यानंतर नियम व कार्यपद्धती यानुसार तक्रारदाराच्या नुकसान भरपाईच्या दाव्याबाबत आदेश पारित करावेत.

(क) विद्वान विभागीय आयुक्त महसूल, अमरावती यांनी संबंधित जलसिंचन विभागाला असा आदेश द्यावा की, विभागाने तक्रारदाराच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यामुळे तक्रारदारांना रु.५०,०००/- (रु. पन्नास हजार) इतकी रक्कम हा आदेश पारित झाल्यावर सहा आठवडयात द्यावेत. सदर रक्कम सदर मुदतीत न दिल्यास त्यावर ती रक्कम देईपर्यंत १२.५०% व्याज द्यावे.

(ड) विद्वान विभागीय आयुक्त महसूल, अमरावती यांनी सदर आदेशांचे अनुपालन सहा आठवड्यात करावे व अनुपालन अहवाल आयोगाला पुढील कारवाईसाठी पाठवावा.

९. खटला क्रमांक : एमएएस/२२११/२०१५

तक्रारदाराचे नाव : पेरपेटुआ फर्नांडीस आणि अँथनी फर्नांडीस

प्रतिवादीचे नाव : पोलीस उपायुक्त, विभाग ८, मुंबई

आदेशाचा दिनांक : ५ मार्च, २०१९

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदाराचे म्हणणे असे आहे की, एका गंभीर गुन्ह्याबाबत प्रथमदर्शनी अहवाल दाखल करण्याला पोलीस अधिकारी यांनी नकार दिला व त्यानंतर योग्य ती काळजी (ड्यु डिलिज्नस) घेतल्यावर सदर प्रथमदर्शनी अहवाल चार वर्षानंतर दाखल केला गेला. थोडक्यात प्रथमदर्शनी अहवाल सादर करण्यात दिरंगाई झाली आहे.

**आयोगाने केलेली कृती :**

संबंधितांना नोटीस पाठवली, त्याला प्रतिवादींनी उत्तर दिले, सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी विचारात घेऊन आयोग पुढील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी ललिता कुमारी गुन्हेगारी खटल्यात याचिका क्रमांक ६८/२००८ मध्ये मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत ती महाराष्ट्र राज्याच्या पोलीस आयुक्तालयांमध्ये अभिसरीत करावीत असा आदेश विद्वान पोलीस महासंचालक यांना देण्यात येत आहे.

(ब) सदर बाब दखलपात्र गुन्हा म्हणून दाखल करणे आवश्यक होते. तक्रारदाराचा प्रथमदर्शनी अहवाल प्रक्रिया फौजदारी प्रक्रिया कलम १५४ अंतर्गत दखलपात्र गुन्हा म्हणून दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांकडून चुका व ढिलाई झाल्यामुळे तक्रारदाराच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले असल्याने विद्वान अतिरिक्त मुख्य सचिव, गृह यांनी तक्रारदार यांना त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यामुळे नुकसान भरपाईपोटी रु.२,००,०००/- (रुपये दोन लाख मात्र) ही रक्कम हा आदेश प्राप्त झाल्यावर ६ आठवड्यात द्यावी, असा आदेश देण्यात येतो.

१०. खटला क्रमांक : एमएएस/२५१९/२०१३-१४ सी/ डब्ल्यू २६९०/१३-१४

तक्रारदाराचे नाव : रुचिका भट आणि नरेंद्रकुमार भट

प्रतिवादीचे नाव : पोलीस उपायुक्त, विभाग १२, मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त, मुंबई

आदेशाचा दिनांक : २६ फेब्रुवारी, २०१९

गणपूर्ती (कोरम) : एम.ए.सईद, प्रभारी अध्यक्ष / सदस्य

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदाराने अशी तक्रार दाखल केली की बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांना निष्कासनाची नोटीस दिली. तक्रारदाराने असे उत्तर सादर केले की ते संबंधित ठिकाणी स्थलांतरित झाले आहेत. दिनांक २५.०५.२०१३ च्या नोटीसचे अनुपालन म्हणून महानगरपालिका विकासकाला कोणतीही बेकायदा कृती करू देणार नाही व त्यांनी कुलूपबंद खोलीत ठेवलेल्या वस्तूंबाबत माहिती दिली. तथापि, बृहन्मुंबई महानगर पालिकेने तक्रारदाराला कोणतीही अधिकृत नोटीस न देता कुलूपबंद खोलीतील वस्तू हलवण्यासाठी पाडापाड केली.

**आयोगाने केलेली कृती :**

संबंधितांना नोटीस पाठवली, त्यानुसार प्रतिवादींनी उत्तर सादर केले. सुनावणी पूर्ण केली.

**आयोगाचा निर्णय :**

अभिलेखावरील सर्व कागदपत्रे व इतर बाबी विचारात घेऊन आयोग पुढील शिफारसी करणे उचित समजतो.

(अ) विद्वान बृहन्मुंबई महानगर पालिका आयुक्त यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांसाठी विशेषतः इमारती व बांधकाम विभागाचे अधिकाऱ्यांसाठी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे ध्येय व आशय त्यांच्यापर्यंत पोचावेत यासाठी संवेदनाशीलता आणण्यासाठी कार्यक्रम आयोजित करावेत . तसेच सदर अधिका-यांनी आपले कर्तव्य पार पाडताना नैसर्गिक न्यायाचे तत्व मनात बाळगावे.

(ब) अधिकाऱ्यांना स्फूर्ती व प्रेरणा मिळावी यासाठी अभ्यासक्रम द्यावेत, महानगरपालिकेच्या विविध विभागातील कामाचे नियमितपणे सुसूत्रीकरण करावे की ज्याद्वारे काम करणाऱ्या चमूमध्ये शिस्त जबाबदारी व समर्पण या गोष्टी याव्यात.

(क) विद्वान महानगरपालिका आयुक्तांनी चूक करणाऱ्या अधिकाऱ्यावर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याचा विचार करावा. त्याचबरोबर संबंधित प्रभाग अधिकाऱ्यांना तक्रारदाराच्या वस्तूंचा ताबा पंचनामा करून तक्रारदारांना सोपवण्यासाठी सूचना द्यावी. तसेच तक्रारदारांच्या वस्तू, मौल्यवान वस्तूंसाठी नुकसान भरपाई देण्याचा विचार करावा.

(ड) विद्वान महानगर पालिका आयुक्त यांनी तक्रारदारांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाल्यामुळे त्यांना रु.१,००,०००/- (रू एक लक्ष) इतकी नुकसानभरपाई हा आदेश प्राप्त झाल्याच्या दिवसापासून ६ आठवड्यात द्यावी.

**विभाग ६ – आयोगाच्या शिफारसीबाबत सरकाराचे अनुपालन किंवा नकार**

| आदेश दिनांक | शिफारस | प्राप्त झालेला अनुपालन अहवाल / पत्रे |
|---|---|---|
| २६.०६.२०१८ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी तक्रारदाराला रु.१,००,०००/- द्यावेत | दिनांक ०६.१०.२०१८ रोजीचे गृह विभागाचे पत्र व नुकसान भरपाईची रक्कम रु.१,००,०००/- तक्रारदाराला दिल्याची पावती प्राप्त झाली. |
| २३.१२.२०१६ | प्रधान सचिव, आरोग्य विभाग यांनी तक्रारदाराला रु.१०,००,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. | तक्रारदाराला दिलेली नुकसान भरपाई मंजूर केल्याबाबत वैद्यकीय व औषध विभाग यांचा दिनांक २४.०९.२०१८ चा शासन निर्णय व प्रदान पावती प्राप्त झाली. |
| १५.०६.२०१६ | राज्याने पीडीत व्यक्तीला रु.१,००,०००/- द्यावेत | १. पोलीस अधिक्षक, सातारा यांच्या दिनांक ०९.०४.२०१८ च्या पत्राची तसेच गृह विभागाचे दिनांक २१.०८.२०१८ रोजीचे पत्र. तसेच नुकसान भरपाईची रक्कम रु.१,००,०००/- तक्रारदाराला दिल्याची पावती प्राप्त झाली. |
| १४.०६.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी मृत मुलाच्या पित्याला रु.५,००,०००/- (रुपये पाच लाख) द्यावेत. | १. गृह विभाग यांचा दिनांक ०९.०३.२०१८ चा शासन निर्णय प्राप्त झाला की ज्याद्वारे मृत मुलाची आई हीस नुकसान भरपाईची रक्कम रु.५,००,०००/- याची लाभार्थी आहे असे कळवले आहे.<br>२. पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयाकडून दिनांक २६.०३.२०१८ चा अहवाल प्राप्त झाला की ज्यामध्ये चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर आयोगाने आदेश दिल्याप्रमाणे कारवाई केल्याचे कळवले आहे.<br>३. गृह विभागाकडून नुकसान भरपाई रक्कम बाबतची दिनांक ०७.०९.२०१८ ची पावती प्राप्त झाली. |
| ०७.०२.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी तक्रारदाराला रु.५०,०००/- देणे. | १. तक्रारदाराला नुकसान भरपाई रु.५०,०००/- देण्यासाठी मंजुरी देणारा दिनांक १२.०३.२०१८ चा शासन निर्णय गृह विभागाला प्राप्त झाला.<br>२. पोलीस महासंचालक यांच्याकडून दिनांक २६.०२.२०१८ चे पत्र प्राप्त झाले की ज्यामध्ये असे नमूद केले आहे की, चूक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची चौकशी करण्याचे आदेश पोलीस आयुक्त यांना देण्यात आले आहे.<br>३. गृह विभागाचे पत्र दिनांक २९.०८.२०१८ व नुकसान भरपाईची रक्कम तक्रारदाराला दिल्याची पावती प्राप्त झाली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १७.१०.२०१६ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग व सचिव, आरोग्य विभाग यांनी तक्रारदाराला एकत्र व वेगवेगळे रु.१२,००,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. | १. गृह विभागाकडून दिनांक १५.०७.२०१७ चे पत्र प्राप्त झाले ज्यामध्ये असे म्हंटले आहे की, तक्रारदारांना रु.५,००,०००/- ची रक्कम राष्ट्रीय मानवी हक्क आयोग (एनएचआरसी) यांच्या आदेशानुसार या पूर्वीच २०१२ साली दिली आहे.<br>२. आरोग्यसेवा नाशिक यांनी संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ यांना पाठवलेल्या पत्राची प्रत व तक्रारदाराला दिलेल्या रुपये ६ लाख इतक्या नुकसान भरपाईच्या रकमेची पावती प्राप्त झाली. |
| २०.०१.२०१७ | राज्याने तक्रारदाराला रु.५०,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. | गृह विभागाचे पत्र दिनांक ०७.०६.२०१८ व तक्रारदाराला दिलेल्या नुकसान भरपाईची पावती प्राप्त झाली. |
| ०३.०५.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी पीडीत मेघनाझ शहा यांना रु.५०,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. | दिनांक २४.०८.२०१८ चे पत्र व तक्रारदारांना रु.५०,०००/- ऐवजी रु.२०,०००/- इतकी रक्कम दिल्याची पावती प्राप्त झाली. |
| ०१.०६.२०१७ | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, प्रधान सचिव यांनी तक्रारदाराला रु.२,५०,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. | महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी पाठवलेले दिनांक ०४.०१.२०१८ चे पत्र प्राप्त झाले ज्यामध्ये निषेध व्यक्त करून तक्रारदाराला नुकसान भरपाई दिली आहे. |
| २६.०४.२०१८ | आरोग्य सेवेचे संचालक यांनी पदे भरण्यासाठी मालकांनी योग्य पावले उचलावीत अशी नोटीस द्यावी. | १. संचालक, आरोग्य सेवा यांनी दिनांक १२.१०.२०१८ रोजी पाठवलेले पत्र व त्याबरोबर विस्तृत अहवाल प्राप्त झाले. हे पत्र तक्रारदाराबाबत केलेल्या शिफारशींची पूर्तता केल्याबाबत आहे. |

**नकार :**

| आदेश दिनांक | शिफारस | नकार अहवाल |
|---|---|---|
| ०१.०४.२०१७ | अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांनी तक्रारदारांना रु.५०,०००/- इतकी नुकसान भरपाई द्यावी. | गृह विभागाचे दिनांक २८.११.२०१८ चे पत्र प्राप्त झाले. त्यामध्ये तक्रारदारांना नुकसानभरपाई देण्यासाठी नकार दिला. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई